**<u>फिर्यादी अमोल संतराम गावडे यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री.ए.व्ही राशिनकर यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –**

०१. प्रस्तुत प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे लिहीण्यात आला. त्यावर मी वाचुन सही केली. त्यातील मजकुर बरोबर आहे.

०२. आता मला यादी क्र.३/१ वरिल ठराव दाखविला. त्यावर चेअरमन यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.१६** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/२ वरिल धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.१७** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/३ वरिल रिटर्न मेमो दाखविला. त्यावर बँकेची सही व शिक्का आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.१८** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/४ वरिल नोटीसची स्थळप्रत दाखविली. त्यावर माझे विधीज्ञांची सही आहे. त्यास **नि.१९** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/४ वरिल पोस्टाची आर.एल. पावती दाखविली. ती तिच आहे. त्यास **नि.२०** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/५ वरिल पोस्टाचे पाकीट दाखविले. त्यास **नि.२१** देण्यात आली. आता मला यादी क्र.१५/१ वरिल कर्ज मागणी अर्ज दाखविला. त्यास **नि.२२** देण्यात आली. आता मला यादी क्र.१५/२ वरिल कर्ज रोखा दाखविण्यात आला. त्यास **नि.२३** देण्यात आली. आता मला यादी क्र.१५/३ वरिल वचनचिठ्ठी दाखविण्यात आला. त्यावर आरोपीच्या सही आहे. त्यास **नि.२४** देण्यात आली. आता मला यादी क्र.१५/४ व ५ वरिल खातेउतारा व भारतीय साक्ष अधिनियम चे कलम ६३ प्रमाणे प्रमाणपत्र दाखविले. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **नि.२५** देण्यात आली. आता मला यादी क्र.१५/६ वरिल व्यवसायासाठी कर्ज

मागणी अर्ज दाखविला. त्यास **नि.२६** देण्यात आली. आता मला यादी क्र.१५/७ वरिल वचनचिठ्ठी दाखविण्यात आली. त्यास **नि.२७** देण्यात आली. सरतपास पुर्ण.

**प्रकरण उलटतपासकरिता पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-

(माधुरी आर.खानवे)

दिनांक २५/०९/२०२५ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०५, अहमदनगर